# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. १७५,१७६, १७८, १७९, १८०, १८१, १८२/२०१० दिनांक :

१) श्रीमती उमव्वा राचगोंड कोळगिरी (तक्रार क्र. १७५/२०१०)
मु.पो. जाडर बोबलाद, ता. जत, जि. सांगली
२) श्री. महिपती नामदेव करपे, (तक्रार क्र. १७६/२०१०)
मु.पो. जालीहाळ खुर्द, ता. जत, जि. सांगली
३) श्री. रघुनाथ धुळा गारळे, (तक्रार क्र. १७८/२०१०)
मु.पो. लकडेवाडी, ता. जत, जि. सांगली
४) श्री. धोंडीराम कृष्णा सकट, (तक्रार क्र. १७९/२०१०)
मु.पो. लकडेवाडी, ता. जत, जि. सांगली
५) श्री. पांडुरंग मल्हारी निळे, (तक्रार क्र. १८०/२०१०)
मु.पो. लकडेवाडी, ता. जत, जि. सांगली
६) श्री. गौंराप्पा नामदेव पाटील, (तक्रार क्र. १८१/२०१०)
मु.पो. जाळीहाळ खुर्द, ता. जत, जि. सांगली
७) श्री. मारुती गेनू चव्हाण, (तक्रार क्र. १८२/२०१०)
मु.पो. जाळीहाळ खुर्द, ता. जत, जि. सांगली

अर्जदार

**विरुध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,
मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली
२) कार्यकारी अभियंता
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली
३) सहाय्यक अभियंता,
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
उप विभागीय कार्यालय, संख, जि. सांगली

विरुध्द पक्षकार

<u>कोरम</u> :–१) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष
२) श्री. जी. बी. पानकर, सदस्य–सचिव
३ श्री. जी.सी. लेले, सदस्य

<u>महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग</u>
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## संयुक्त न्याय निर्णय

श्री. जी.सी. लेले, सदस्य, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

वरील १ ते ७ ग्राहकांनी मंचाकडे शेतीपंपासाठी वीज पुरवठा व्हावा म्हणून वि.प.कडे रकमेचा भरणा केलेला आहे. तथापि वीज जोडणी न मिळाल्याने अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्ष, सांगली सर्कल यांच्याकडे ' क्ष ' नमुन्यात तक्रार दाखल केलेली आहे सदर कक्षाच्या दिलेल्या निर्णयावर नाराज होवून सी.जी.आर.एफ. कोल्हापूर यांच्याकडे ' अ ' नमुन्यात तक्रार दाखल केली आहे. वरील सर्व तक्रारी मंचात दि. १२.८.२०१० रोजी दाखल झाल्या आहेत. तक्रारी दाखल करुन मंचाने वि.प.कडून मुद्देनिहाय अभिप्राय मागविला. सदरचे अभिप्राय प्राप्त झाल्यावर सांगली सर्कल विश्रामबाग येथे दि. १७.९.२०१० रोजी सुनावणी निश्चित केली. सुनावणीस ग्राहक व प्रतिनिधी गैंरहजर. वि.प.तर्फे श्री. आर.आर. टिळक, सहाय्यक अभियंता, कवठे महंकाळ व श्री. मैंलापूरे, कनिष्ठ अभियंता उपस्थित. पूर्व सूचना देवूनही कार्यकारी अथिंता तथा नोडल ऑफीसर गैंरहजर होते. मुख्य कार्यालय, मुंबई येथे मिटींगचे कारण सांगितले. तथापि सर्कलतर्फे श्री. ए.एच. चव्हाण उपस्थित होते, मात्र कामकाज व तक्रारीसंबंधी कोणतीही माहिती घेतलेली नव्हती. मंचाने याची विशेष नोंद घेतलेली आहे.

सर्व तक्रारी कवठे महंकाळ विभाग व संख उप विभागातील आहेत. तसेच रक्कम जमा आहे पण जोडणी दिलेली नही वा चुकीची जमा रक्कम परत करावी अशा स्वरुपाच्या सर्वसाधारण तक्रारीचे स्वरुप असल्याने व एकाच दिवशी सर्व तक्रारींची सुनावणी घेतली असल्याने तक्रार १ ते ७ याचा न्यायनिर्णय व आदेश एकत्रित पारीत केलेला आहे. तो खालील प्रमाणे –

तक्ररीचा सर्वसाधारण गोषवारा :

वरील ग्राहकांनी तत्कालीन वेळेला वि.प.ने सांगितल्याप्रमाणे रकमा जमा केलेल्या आहेत. तथापी वीज नियामक आयोगाच्या ८ सप्टेंबर २००६ च्या आदेशाप्रमाणे ( शेड्यूल ऑफ चार्जेस ) रक्कम घेणे उचित नसतांना ( मिटर कॉस्ट, करारपत्र, कपॅसिटर टेस्टींग फी, पोल इ.) घेतलेली आहे ती परत मिळावी व त्वरीत वीज जोडणी मिळावी. विलंबाबद्दल भरपाई मिळावी इ. मागणीसह अर्ज दाखल केले आहेत.

वि.प.ची भूमिका

ग्राहकाने मागणी केल्यप्रमाणे तत्कालीन रकमा त्या त्या हेडखाली जमा करुन घेतल्या आहेत. तथापी मा. आयोगाच्या आदेशाप्रमाणे सदरच रकमा परत करत असल्याचे वि.प.ने नमूद केले आहे. तथापि मा. आयोगाच्या आदेशाप्रमाणेच ज्यांनी कमी रकमा जमा केल्या आहेत, त्या ग्राहकांनी उर्वरित रक्कम जमा करुन चाचणी अहवालासह सर्व कागदपत्र हजर केल्यास जोडणी देवू असे नमूद केले आहे. ग्राहकांनी चाचणी अहवाल दिलेले आहेत, तथापि प्रत्यक्षात जागेवर संच मांडणी झालेली नही, त्यामुळे भरपाई देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. तरीही सर्व पूर्तता केल्यास जोडणी देवू अशी भूमिका वि.प.ने घेतलेली आहे.

सर्व कागदपत्रांचा व सुनावणी दरम्यानची कथने, अंतर्गत कक्षाचा निर्णय याचा एकत्रित अभ्यास करता, पुढील मुद्दे निष्कर्षासाठी उभे राहतात.

मुद्दा क्र. १ : ग्राहकाने मागितलेल्या अशा रकमा परत करणे वा कमी रक्कम जमा करुन घेणे योग्य आहे काय ?

उत्तर : ' होय ' ८ सप्टेंबर २००६ च्या मा. आयोगाच्या आदेशानुसारच रक्कम जमा घ्यावी लागेल. नाकारलेल्या मथळ्याखाली रकमा परत कराव्या लागतील. तसेच आवश्यक रकमा जमा करुनही घ्याव्या लागतील.

मुद्दा क्र. २ : आदेश ?
उत्त : अंतिम आदेशाप्रमाणे

कारणमिमांसा

वरील क्र. १ ते ७ या ग्राहकांनी वि.प.ने तत्कालीन परिस्थितीत कळविल्याप्रमाणे रकमा जमा केलेल्या आहेत, हि गोष्ट उभयतांना मान्य आहे. वरील सर्व ग्राहकांना अद्यापी जोडण्या देण्याच्या आहेत. त्यामुळे आजमितीस कागदपत्रांच्या पूर्ततेनंतर जोडणी द्यावयाची झाल्यास प्रचलित नियमाप्रमाणे म्हणजेच आयोगाच्या ८ सप्टेंबर २००६ च्या आदेशाप्रमाणेच रकमा जमा घ्याव्या लागतील. पूर्वीच्या हेडखाली घेतलेल्या रकमा ( मिटर कॉस्ट, करारपत्र, कपॅसिटर टेस्टींग फी, पोल, इ.) परत करुन नव्याने आयोगाच्या आदेशाप्रमाणे ३ एच.पी. पर्यंतच्या जोडणीस सर्व्हीस कनेक्शन चार्जेस रु. २५००/- व सुरक्षा ठेव रु.१५००/- अशी एकूण रु. ४०००/- रक्कम जमा होवून उर्वरित जादा रक्कम परत करावी लागेल किंवा जमा रक्कम रु. ४०००/- पेक्षा कमी असल्यास भरुन घ्यावी लागेल. ५ एच.पी.साठी सर्व्हीस कनेक्शन चार्जेस रु. २५००/- व सुरक्षा ठेव रु.२५००/- असल्याने अशा ग्राहकांच्याकडून रु. २५०० + रु. २५०० = रु. ५०००/- अशी रक्कम जमा घ्यावी लागेल. तसेच सदरच्या ग्राहकांना सर्व्हीस कनेक्शन चार्जेस व सुरक्षा ठेवीच्या नव्याने पावत्या देवून जुन्या पावत्या रद्द कराव्या लागतील मूळ पावत्या ग्राहकाकडे मिळत नसल्यास तसे ‘ प्रतिज्ञापत्र ‘ ग्राहकाने पूर्ण करुन द्यावे लागेल. सदरची जादा रकमेचे वीज जोडणी दिल्यावर बिलातून समायोजन करावे. मात्र तक्रार क्र.१८२/१० ने रु. ३०२०/- इतकीच रक्कम वि.प.कडे जमा केली असल्याने रु. ९८०/- इतकी रक्कम वि.प. कडे जमा करावी. त्याचप्रमाणे तक्रार क्र . १७८/१० मध्ये रु. ५०००/- जमा करणे आवश्यक आहे. पैंकी रु. ३७००/- इतकीच रक्कम जमा असलेने रु. १३००/- जमा करणे आवश्यक आहे. तक्रार क्र.१७६/१० श्री. करपे यांनी रु. ३०२० + १५० = रु. ३१७०/- इतकी रक्कम जमा केलेली आहे. तथापि श्री. करपे यांना रु. ४०००/- रक्कम जमा करावी लागते पैंकी रु. ३१७०/- वजा जाता रु.८३०/- इतकी रक्कम वि.प.कडे जमा करावी. बाकीचे ग्राहक क्र . १७५/१०, १७९/१०, १८०/१० व १८३/१० यांना जादा जमा रक्कम खाली नमूद केल्याप्रमाणे परत द्यावी लागणार आहे.

| अ.क्र. | तक्रारदार ग्राहकाचे नांव, तक्रार क्र., वीज भार मागणी | भरावी लागणारी रक्कम<br>सर्व्हीस कनेक्शनचार्जेस +<br>सुरक्षा ठेव = एकूण | जमा रक्कम | परत देणेची रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | श्रीमती उमव्वा राचगौंडा कोळगिरी<br>त.क्र. १७५/१० – ३ एच.पी. | २५०० + १५०० = ४०००/- | ६८७०/- | २८७०/- |
| २ | श्री. धोंडीराम कृष्णा सकट<br>त.क्र. १७९/१० – ३ एच.पी. | २५०० + १५०० = ४०००/- | ४१२०/- | १२०/- |
| ३ | श्री. पांडुरंग मल्हारी निळे<br>त.क्र. १८०/१० – ३ एच.पी. | २५०० + १५०० = ४०००/- | ४१२०/- | १२०/- |
| ४ | श्री. गौंराप्पा नामदेव पाटील<br>त.क्र. १८१/१० – ३ एच.पी. | २५०० + १५०० = ४०००/- | ४६२०/- | ६२०/- |

वरील १ ते ५ च्या कॉलम क्र. ५ मध्ये दाखविलेल्या रकमेचे बिलातून समायोजन करावे.

आवश्यक ते कागदपत्र पूर्ण करुन देण्याची जबाबदारी ग्राहकांची आहे. त्यातीलच एक भाग म्हणजे चाचणी अहवाल सादर करणे होय. त्यामुळे वरील १ ते ७ ग्राहकांनी त्वरीत चाचणी अहवाल सादर करणे आवश्यक आहे. चाचणी अहवालाप्रमाणे ज्यांनी पूर्तता केली आहे अशा ग्राहकांना ३० दिवसांचे आंत वि.प.ने वीज जोडणी द्यावी असे मंचाचे मत आहे. खालील प्रमाणे आदेश करण्यात येत आहेत.

## आदेश

१) तक्रार क्र. १७५/१०, १७९/१०, १८०/१० व १८१/१० यांना वर टेबलमधील कॉलम ५ मध्ये नोंदविलेल्या रकमेचे वीज जोडणीनंतर बिलातून समायोजन करावे.

२) तक्रार क्र. १७६/१०, १७८/१० व १८२/१० मध्ये अनुक्रमे रु. ८३०/–, रु. १३००/– व रु. ९८०/– इतक्या रकमा ग्राहकाने वि.प.कडे जमा कराव्यात.

३) सर्वांनी तात्काळ चाचणी अहवाल वि.प.कडे दाखल करावेत व त्याची पूर्तता करावी तसे झाल्यावर ३० दिवसांचे आंत वि.प.ने सर्व ग्राहकांना वीज जोडणी द्यावी.

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक : ( जी. सी. लेले )
सदस्य

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष :

श्री. जी. बी. पानकर, सदस्य सचिव :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

( बी. जी. पवार )
अध्यक्ष